# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १८० /२०१८

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २७ ऑगस्ट, २०१८ रोजी झालेल्या सभेमध्ये खालीलप्रमाणे ठराव मान्य झालेला आहे.

मः २२६/२७०८१८

असा ठराव करण्यात येतो की, सर्व महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त संस्थांनी शिक्षक मान्यतेसाठीच्या प्रस्तावाबरोबर निवड समितीचा अहवाल व इतर सर्व मूळ कागदपत्रे आणि निवड समितीच्या अहवालाव्यतिरिक्त संबंधित कागदपत्रांची पीडीएफ फाईल असलेली सीडी शैक्षणिक विभागामध्ये सादर करावी.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, सदर प्रस्तावावर विद्यापीठाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व विद्यापीठाकडे सादर केलेली मूळ कागदपत्रे व सीडीमधील माहिती यांची पडताळणी झाल्यानंतर मूळ कागदपत्रे संबंधित महाविद्यालये / संस्थेस तीन महिन्यांनंतर परत करण्यात यावीत व अशी कागदपत्रे मिळाल्याची पोहोचपावती संबंधित महाविद्यालये / संस्थांकडून घेण्यात यावी.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, माहिती अधिकारामध्ये निवड समितीच्या अहवालाव्यतिरिक्त मागविलेल्या कागदपत्रांची पूर्तता ही संबंधित महाविद्यालये / संस्थांकडून करण्यात यावी.

उपरोक्त ठरावाप्रमाणे सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थांनी सदर कार्यवाही ही दि. १ ऑक्टोबर, २०१८ पासून करणे अनिवार्य आहे.

गणेशखिंड, पुणे-४११००७ )
जा.क्र. सीसीओ/२०८७/२०१८ )
दिनांक : १ ऑक्टोबर, २०१८ )

१/१०/१८

उपकुलसचिव
( शैक्षणिक विभाग )

प्रत माहितीसाठी :

१) मा. अपिलीय प्राधिकारी, तथा कुलसचिव, माहिती अधिकार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२) माहिती अधिकारी, माहिती अधिकारी कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.